# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव

## अवैध गौणखनिज वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याकामी जिल्हा खनिकर्म अधिकारी जळगांव यांना भाडे तत्वावर बोलेरो हे वाहन लावणेबाबत.

### ई-निविदा सूचना

सन 2019-20 या अर्थिक वर्षापासुन अवैध गौण खनिज वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याकामी जिल्हा खनिकर्म अधिकारी जळगांव यांना भाडे तत्वावर बोलेरो घ्यावयाचे आहे. वाहन पुरवठाधारक /मुळ वाहन मालक यांचेकडुन ई-निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार | आवश्यक असणारे वाहने | प्रति माह मर्यादा (प्रती वाहन) | निविदा फी रुपये | बयाणा रक्कम रुपये | सुरक्षा अनामत रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बोलेरो | 1 वाहन (चालकासह) | रक्कम रुपये 25000/- | 1000/- | रक्कम रुपये 2500/- | 10000/- |

सदरील निविदाबाबत सर्व अटी व शर्ती **www.jalgaon.nic.in व http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील ई-निविदाबाबत वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दिनांक 13/11/2019 | ---- |
| ई-निविदा स्वीकृती | दिनांक 22/11/2019 | वेळ 16.00 पर्यत |
| ई-निविदा उघडणे | दिनांक 25/11/2019 | वेळ 11.00 ते 13.00 पर्यत |

**1.अटी व शर्ती**

1. निविदेचा आर्थिक लिफाफा व तांत्रीक लिफाफा **http://mahatenders.gov.in** या संकेत स्थळावर सादर करावा.
2. यशस्वी पुरवठादाराने पुरवठा केलेल्या वाहनाची मुदत करारनामा करुन दिलेचे दिनांकापासुन 11 महिन्याच्या कालावधीपर्यंत राहील.
3. यशस्वी लिलाव धारकाने सुरक्षा अनामत रक्कम जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे नावे डी.डी. स्वरुपात जमा करावी.
4. कोणतेही कारण न देता एक सर्व निविदा स्विकारण्याचा तसेच नाकारण्याचा रद्द करण्याचा व भाडे तत्वावर लावणेत आलेल्या वाहनांचे संख्येत वाढ अथवा घट करण्याचा अधिकार वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या शासन निर्णय/परिपत्रकानुसार वाहन वापर कालावधी वाढविणे/कमी करणे अथवा करार रद्द करणे याबाबतचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.
5. 24 तासात 250 किमी पेक्षा जास्त अंतर प्रवास झाल्यास प्रति किमी दरानुसार भाडे आकारण्यात येईल.
6. इंधन शासकीय कार्यालयातर्फे पुरविल्यास त्याची रक्कम अंतिम देयाकातुन वजा करण्यात येईल.
7. मंजुर दराव्यतिरिक्त कुठलाही भत्ता चार्जेस देता येणार नाही.
8. कमीत कमी दर धारक मक्तेदारास वाहन पुरविणेचा कार्यारंभ आदेश दिला जाईल. कार्यालयास वाहन देण्याची पुरवठाधारकाची जबाबदारी राहील निविदा मंजुर केल्यानंतर वाहन पुरविण्यास नकार देणाऱ्या मक्तेदारास सुरक्षा अनामत रक्कम गोठवुन त्यांचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल
9. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण जळगांव यांच्याकडील दिनांक 23/09/2019 रोजीच्या भाडेपत्रकामधील अटी व शर्ती निविदाधारकाला बंधनकारक राहतील
10. वाहनांचे सर्व कागदपत्रे (आरसी/टीसी बुक विम्याची कागदपत्रे, वाहनाचा परवाना, वाहन चालकाचा परवाना इत्यादी) अद्यावत असणे आवश्यक आहे व ती वेळोवेळी अद्यावत ठेवण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.
11. वाहनाचे मॉडेल उत्पादन वर्ष 2015 पासुन पुढील असावेत.
12. वाहन मालकास 24 तास वाहन सोपविलेल्या कार्यालयास पुरविणे बंधनकारक राहील तसेच शासकीय सुट्टीच्या दिवशी वाहनांची गरज भासल्यास वाहन कार्यालयास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील

सांगितलेल्या वेळेपेक्षा उशिरा येणाऱ्या वाहनाचा प्रत्येक तासासाठी रक्कम रुपये 100/- प्रमाणे तसेच वाहन न पुरविल्यास प्रति दिवस रक्कम रुपये 500/- इतका दंड वाहनाच्या देयकातुन कपात करण्यात येईल.

13. बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.
14. यशस्वी निविदा धारकाने पुरवठा केलेल्या वाहनावर कोणत्याही कारणास्तव दिवाणी अथवा फौजदारी दावा न्यायालयात दाखल नसावा.
15. निविदा मंजुर करणे अथवा नाकारणे आवश्यक वाटल्यास अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा किंवा दरासंदर्भात तडजोड (Negotiation) करणेबाबतचे सर्व हक्क जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडेस राखुन ठेवणेत आलेले आहेत.
16. वाहन मालकाने लॉगबुक अद्यावत करावे व ते प्रमाणीत केल्यानंतर देयक सादर करावे. त्याशिवाय मासिक भाडे अदा केले जाणार नाही.
17. निविदाधारकास भाडतत्वावर वाहनाचे अदा करण्यात येणाऱ्या देयकातुन नियमानुसार टीडीएस कपात करण्यात येईल
18. वाहन वापरवयाच्या काळात वाहनास अथवा वाहन चालकास कोणत्याही स्वरुपाचा अपघात अथवा नुकसान झाल्यास त्यास जिल्हा प्रशासनाकडुन नुकसान भरपाई मिळणार नाही.
19. वाहनाचा तसेच आतील सर्व प्रवास करणाऱ्या व्यक्तीचा (Comprehensive) विमा वाहन मालकास स्वत: काढावा लागेल.
20. पुरवठाधारकास निवडीचा आदेश निर्गमित झाल्यानंतर उपरोक्त नमुद अटी व शर्ती रु.100/- चे स्टॅम्प पेपरवर पुरवठा धारकाने स्वखर्चाने करारनामा करुन देणे आवश्यक आहे.
21. शासन निर्णय 28 सप्टेंबर 2018 नुसार जी.एस.टी वजावट केली जाईल तरी निविदेत जी.एस.टी.सह दर भरावे.
22. सदर ई-निविदे संबधित सर्व माहिती **jalgaon.nic.in** व **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

**2. तात्रीक लिफाफा भरतांना त्यात खालील प्रमाणे कागदपत्रांचा समावेश असावा.**

1. वाहनांची आर.सी.टी.सी. बुक व विम्याच्या अद्यावत पावत्या वाहनाचे परमिट कागदपत्राच्या छायांकित प्रती
2. Income Tax Return of Last Year and PAN CARD.
3. निविदा फी व बयाणा रक्कम भरणा केलेली पावती
4. वाहनांचे रोड टॅक्स व वाहतुक परवाना अद्यावत प्रत वाहनांचे फोटो.
5. वाहनांचे अद्यावत योग्यता आरटीओ यांचे प्रमाणपत्र
6. वाहनांचे संपुर्ण विमा व प्रवासी विमा काढलेले अद्यावत प्रत
7. वाहन चालकाच्या परवान्याची व आधारकार्ड ची सत्यप्रत
8. जी.एस.टी. रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र
9. निविदेमधील अटी व शर्ती मान्य असलयास 100 रुपये स्टॅम्प पेपरवर नोटरी रजिस्ट्रेशन.
10. मोटार वाहन कार्यालयातील नोंदणीकृत मोटार व्यवसायीक मक्तेदार जर इतर व्यक्तीचे वाहन भाडे तत्वावर घेत असेल तर त्या व्यक्तीचे वाहन भाडे तत्वावर लावणेबाबतचे वाहन मालकाचे ना हरकत करारनामा रुपये 100/- चे स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहील.
11. निविदा उघडतांना सर्व निविदा धारकाची लिफाफा क्र.2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व कागदपत्रांची मुळ कागदपत्रावरुन कमिटीद्वारे तपासणी करणेत येईल वतांत्रीक लिफाफयात नमुद कागदपत्रे उक्त नमुद बाबीनुसार आढळल्यानंतर त्या निविदा धारकांचा आर्थिक लिफाफा उघडणेत येईल.

**(डॉ.अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी जळगांव**